नि.दि.दावा क्र.५३/२०१६
अवतारसिंग वि. रवि

**आदेश नि.५७ वर**

१. प्रतिवादीने दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज आणि वादीने त्यावर दाखल केलेले म्हणणे यांचे अवलोकन केले.

२. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

३. प्रस्तुतच्या अर्जामध्ये प्रतिवादीने असे नमुद केले आहे की न्यायालयाने प्रकरणामधील त्यांचा पुरावा बंद केला. त्यामुळे प्रतिवादीने अर्जाव्दारे त्यांच्याविरूध्द झालेला पुरावा बंदचा आदेश रद्द करून त्यांना प्रकरणामध्ये पुरावा देण्याची संधी दयावी अशी विनंती केली.

४. सदर अर्ज हा प्रकरणामध्ये विलंब व्हावा यासाठी प्रतिवादीने दाखल केला आहे. त्यामुळे त्यांच्याविरूध्द झालेला पुरावा बंदचा आदेश रद्द करू नये अशी विनंती वादीने केली.

५. सदर अर्जासोबत प्रतिवादीने स्वताच्या पुराव्याचे शपथपत्र देखिल प्रकरणामध्ये दाखल केले. त्यावरून प्रतिवादीला प्रकरणात विलंब करायचा आहे असे म्हणता येत नाही. तसेच प्रकरणाचा निकाल गुणदोषावर लागण्यासाठी प्रतिवादीला प्रकरणात पुरावा देण्याची संधी देणे न्यायोचित ठरते. यासर्व बाबींचा विचार करता प्रतिवादीचा अर्ज रूपये २०० खर्च लावून मंजुर होण्यास पात्र ठरतो. त्यामुळे मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज नि.५७ खर्च रूपये २०० लावून मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी विरूध्द प्रकरणात त्यांचा पुरावा बंदचा झालेला आदेश रद्द करण्यात येत आहे.

दि.३०/०६/२०२२

(व्यं.वि.नाशिककर)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,वाशिम

**Certificate**.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same word to word, as per the original order.

Name of the Stenographer : R.M.Rajurkar (Stenographer-II)
Court Name : Civil Judge (Sr.Dn.), Washim.
Date : 30.06.2022
Order signed by the Presiding
Officer on : 30.06.2022
Order uploaded on :30.06.2022